असा. क्र. ३४ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, ऑगस्ट ८, २००८/श्रावण १७, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

**सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.**—महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . पृष्ठे ३३५-३३६

दिनांक ६ ऑगस्ट २००८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. एन. गिलानी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ८ ऑगस्ट २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९५६ चा मुंबई ४९. **ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.



भाग चार —७० [किंमत : रुपये १५.००]

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४९ याच्या कलम ६ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम याच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :— १९५६ चा मुंबई ४९.

" (४) प्रत्येक सदस्याला, दौरे करण्याच्या प्रयोजनासाठी मैल भत्ता म्हणून दरमहा रुपये २५,००० इतकी ठोक रक्कम देण्यात येईल. " .

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई